# बुलडाणा बँकेत ऑटोव्हॉल्ट लॉकर सुविधा

## ■ दादर येथील शाखेत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याहस्ते लोकार्पण



**मुंबई : बुलढाणा बँकेच्या दादर येथील शाखेत ऑटोव्हॉल्ट लॉकर यंत्रणेचे लोकार्पण करताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी. यावेळी मंत्री गिरीश बापट, खासदार आनंदराव अडसूळ यांच्या विविध मान्यवर उपस्थित होते.** (छाया : अजिंक्य सावंत)

**मुंबई : प्रतिनिधी**

बुलडाणा नागरी सहकारी बँकेच्या दादर येथील शाखेत ग्राहकांना अधिकाधिक सुविधा देण्यासाठी रोबोटिक ऑटोव्हॉल्ट लॉकर सिस्टिमचे लोकार्पण केंद्रीय नागरी उड्डाणमंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी गडकरी यांनी बुलडाणा बँकेच्या आधुनिकतेचे कौतुक केले. बुलडाणा सहकारी बँक एक सोसायटी असताना तिने नॉन सोसायटी क्षेत्रात केलेल्या कामांचे कौतुक गडकरी यांनी केले.

दादर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारकात आयोजित कार्यक्रमावेळी केंद्रीय महामार्ग, जहाजउद्योगमंत्री नितीन गडकरी, अन्न व नागरी पुरवठा मंत्री गिरीष बापट, बनमंत्री सुधीर मुनगुंटीवार, खासदार आनंदराव अडसूळ, जयंत साळगावकर, राधेश्याम चांडक आदी उपस्थित होते. बुलडाणा बँकेने ग्राहकांच्या ठेवी आणि दागिने सुरक्षित ठेवण्यासाठी खास जापनीज टेक्नोलॉजीच्या रोबोटिक ऑटोव्हॉल्ट तिजोरीची सोय उपलब्ध करुन दिली आहे. यावेळी ऑटोव्हॉल्ट रोबोटिक तिजोरीचे पहिले ग्राहक म्हणून किरण उटशील यांचा नितीन गडकरी यांच्या हस्ते सत्कार झाला.

या डिजिटल युगात कमालीची सुरक्षितता उपलब्ध करु शकेल असे तंत्रज्ञान पुरविण्याची जबाबदारी बुलडाणा बँकेने उपलब्ध केल्याबद्दल गडकरींनी बँकेचे कौतुक केले. शिवाय १९८६ साली अवघ्या १२ हजारांच्या भांडवलावर सुरु झालेल्या या बँकेचे आता लाखो ग्राहक आणि ७ हजार लाखाहून अधिकच्या ठेवी हा ग्राहकांनी बँकेवर ठेवलेला विश्वास असल्याचेही नितीन गडकरी यांनी यावेळी सांगितले.